International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.3 Jan – Feb 2022

# दिव्यांगांची ऐतिहासिक पार्श्वभूमी (प्राचीन काळ ते १९ वे शतक)

**प्रा. दत्तात्रय कुंडलिक पाटील**

*प्रमुख, समाजशास्त्र विभाग,*

*कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य आणि*

*शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी. ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.*

***गोषवारा:***

*दिव्यांग हा जगभरातील सर्वात मोठा अल्पसंख्यांक समुदाय आहे. हा समुदाय सर्वाधिक उपेक्षित राहिलेला आहे. यामुळे दिव्यांग गट असुरक्षित असून हा सर्वाधिक शोषित आहे. प्राचीन काळापासून १७ वे ते १८ वे शतक, १९ वे शतक, २० व्या शतकाच्या उत्तरार्धात बहुतांश देशांनी दिव्यांग असणाऱ्यांच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली. या दिव्यांग समूहासाठी शासकीय व अशासकीय मदतीने उपचार व पुनर्वसन करण्यास सुरुवात झाली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारत सरकारने या गटाची जबाबदारी स्वीकारली व उपचार, पुनर्वसन कार्यक्रमांची आखणी केली.*

***मुख्य शब्द :*** *दिव्यांग, अल्पसंख्याक, शोषित, उपचार, पुनर्वसन*

**प्रस्तावना :**

दिव्यांग समूहाच्या प्राकृतिक, शारीरिक आणि सामाजिक अडथळ्यामुळे त्यांना समाजात समायोजन साधता येत नाही. समाज या समूहाकडे तिरस्काराने पहात असतो. पूर्वजन्मीच्या पापामुळे हे दिव्यांग झालेले आहेत असा पिढ्यान पिढ्या रुजलेला समज, गैरसमज आजही कायम आहे. परिणामी दिव्यांग समूहाला व त्यांचे आई, वडील, नातेवाईक, कुटुंबीय यांना अनेक प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागते. दिव्यांग समूहाला समाज अघोषितपणे वाळीत टाकत असतो. सर्वसामान्यपणे व्यक्ती जीवनात धर्म, वंश, जात, प्रांत, सत्ता, आर्थिक स्तर यामुळे श्रेष्ठ कनिष्ठतेचे अनुभव येत असतात. दिव्यांग समूहाला मात्र दुहेरी श्रेष्ठ कनिष्ठता व तिरस्कार अनुभवावा लागत असतो. जाती, धर्म, वंश यातील श्रेष्ठ कनिष्ठता वाट्याला आलेली असतेच पण त्याचबरोबर विकलांग व्यक्ती म्हणून सोसावा लागणारा छळ, उपेक्षा, शोषण यातूनही मुक्ती नसते. दिव्यांग समूहातील व्यक्तीला व्यक्तिमत्व विकासातील अडथळ्यांना सातत्याने तोंड द्यावे लागत असते. त्यांचा भावनिक, शारीरिक विकास

होण्यात अनेक अडथळे पुढे ठाकलेले असतात. आई वडिलांव्यतिरिक्त सर्व समाजाला ही मुले नकोशी असणारी मुले असतात. दिव्यांगाना शारीरिक अपंगत्व निसर्गाने दिलेले असते तर भावनिक अपंगपण कुटुंब, नातेवाईक, समाज देत असतो. या समूहाच्या समाजिकीकरणासाठी कुटुंब, नातेवाईक, समाजाकडून कोणतेही प्रयत्न होत नाहीत. त्यामुळे समाज त्यांच्या सर्व संधी नाकारत असतो. त्यामुळे ते कूचकामी, घर व समाजाला भार आहेत असे चित्र वारंवार निर्माण केले जात असते. असे असले तरी जगभरात दिव्यांग व्यक्तींनी कितीतरी महत्त्वाची कामे केलेली आहेत. महत्त्वाचे शोध लावलेले आहेत. अल्बर्ट आईन्स्टाईनला डिस्लेक्सिया हा आजार होता. त्याने सापेक्षतावादाचा सिद्धांत जगाला दिला. थॉमस अल्वा एडिसनला नीट ऐकू येत नसे पण त्याने विजेचा शोध लावला. लुईस ब्रेल दृष्टीहीन होता पण त्याने ब्रेललिपी शोधून काढली (कछल दिपिका, २०१६:४) ही काही वानगी दाखल उदाहरणे आहेत. जगभरात हा समूह जगाच्या लोकसंख्येच्या १५% इतका आहे.  भारतात २६ दशलक्ष लोक विकलांग आहेत असे २०११ ची जनगणना सांगते. भारतातील विकलांगांची लोकसंख्या ऑस्ट्रेलियाच्या एकूण लोकसंख्येपेक्षा जास्त आहे  (सिंह अर्चना, २०१६:८) त्यामुळे दिव्यांग समूहाचा समग्र अभ्यास होण्याची गरज आहे. या समूहाची स्थिती, गती, समस्या व उपाय याबाबत सखोल अभ्यास झाल्यास पुढील संशोधकांना त्याचा उपयोग होणार आहे म्हणून हा अभ्यास करणे गरजेचे आहे. हा दिव्यांग हा समाजातील अधिक उपेक्षित घटक आहे. म्हणून दिव्यांग समाजाचा अभ्यास समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास महत्त्वाचा ठरणार आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**:

दिव्यांग आणि दिव्यांगांची ऐतिहासिक पार्श्वभूमी या विषयाच्या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात खालील उदिष्टांना अनुसरून अभ्यास करण्यात आलेला आहे.

१) दिव्यांगांचा परिचय यांचा अभ्यास  करणे.

२) दिव्यांगांची ऐतिहासिक पार्श्वभूमी याचा अभ्यास करणे.

३) प्राचीन काळापासून ते १९ व्या शतकातील दिव्यांगांचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधसाठी दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केला यात मासिके, परिपत्रके, पुस्तके, प्रबंध, प्रकाशित आणि अप्रकाशित लिखाण , ग्रंथ, वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, इंटरनेट वेबसाईट  यांचा  वापर केला आहे.

**दिव्यांगांची ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

**१) प्राचीन काळ:**

दिव्यांगांचे उल्लेख प्राचीन साहित्यात आढळतात. पश्चिमेकडील देशांमध्ये प्रागैतिहासिक काळात दिव्यांग मुलांना जन्मापूर्वीच मारले जाई असे उल्लेख आढळतात. तर पाषाण युगात अशा व्यक्तींना पिशाच्च असे संबोधले जाई. त्या काळात जादूटोणा, तंत्र मंत्र, झाडपाला, प्रार्थना करून किंवा डोक्यावर मार देऊन अशा व्यक्तींना बरे केले जाई असे उल्लेख आढळतात. अथर्ववेदामध्ये दिव्यांग व्यक्तीला बरे करण्यासाठी गरम आणि थंड पाण्याचा प्रयोग केला जाई. विविध वनस्पती आणि पानांचा उपयोग करून योग चिकित्सा पद्धतीचा उपयोग केला जात होता असे उल्लेख आढळतात. प्राचीन काळात दिव्यांग व्यक्ती विषयी अनेक श्रद्धा, अंधश्रद्धा रूढ असल्याचे दिसते. पूर्वजन्मीचे पाप म्हणूनच दिव्यांग व्यक्तीचा जन्म झाला असावा असे सर्रास समजले जात होते. सांख्यदर्शनामध्ये मतिमंदांचा (बौद्धिक अक्षमतेचा) उल्लेख आढळतो. रामायणामध्ये राणी कैकयीची दासी मंथरा मंदबुद्धीची होती. (जोसेफ आर. ए., २००४: ५) यावरून दिव्यांग व्यक्तीचे अस्तित्व मानव जन्मापासूनच असल्याचे आढळते.

इसवी सन पूर्व चौथ्या शतकात कौटील्याच्या अर्थशास्त्रामध्ये दिव्यांग व्यक्तीविषयी अपमान जनक शब्दांचा वापर करू नये असे लिहिले आहे. तसेच मुक्या, बहिऱ्या व्यक्तींना गुप्तचर म्हणून ठेवल्याचे उल्लेख आढळतात. उपनिषदामध्ये दिव्यांग व्यक्तीमुळे आई-वडिलांची चिंता वाढते असा उल्लेख आढळतो. दिव्यांगांमध्ये महान व्यक्ती झाल्याचेही उल्लेख आढळून येतात. महात्मा अष्टवक्र, श्रीकृष्णाचा मित्र सुदामा, राजा धृतराष्ट्र इत्यादी दिव्यांगच होते. ग्रीक तत्त्ववेत्ते हिप्पोक्रेटस (इसवी सन पूर्व ४६० ते ३५७) यांनी शारीरिक रोगाप्रमाणे मानसिक रोग विविध कारणाने निर्माण होतात. अशा व्यक्तींची काळजी घेणे गरजेचे आहे असे विचार मांडलेले आहेत. इर्थर्ना चिरूपल्कुर आणि अय्यावार (इसवी सन पूर्व २००) यांच्या साहित्यात मंदबुद्धीच्या व्यक्तीचा उल्लेख आढळतो. (जोसेफ आर. ए., २००४: ५) इसवी सन पूर्व १८५ – ६० मधील साहित्यातही मतिमंदांचा उल्लेख आढळतो. महान चिकित्सक चरकनी यांनी मंदबुद्धीची कारणे सांगून वर्गीकरण केलेले आहे. बौद्ध ग्रंथांमध्ये दिव्यांगास पूर्वाजन्मीचे पाप म्हटले आहे. 'मनु' संहितेमध्ये पूर्वजन्मीचे पाप, अपराध इत्यादी कारणांने दिव्यांग व्यक्ती जन्मतात असे वर्णन केले आहे. (लवानिया एम., जैन शशि, १९९८: ३८)

**२) पहिल्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत:**

या काळात दिव्यांगाविषयी विस्तृत माहिती लिहिलेली आहे असे दिसत नाही. मुखर्जी (१९८३) यांच्यामते इसवी सन ३२० ते ४८० गुप्त सम्राटाच्या काळात दिव्यांगासाठी प्रशिक्षण व पुनर्वसन यांच्यासाठीच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. याच काळात सर्व धर्मात दिव्यांग व्यक्तींना सन्मान व सेवा देण्याबाबतचे उल्लेख

आढळतात. हिंदू धर्मात दिव्यांगांची सेवा केल्यास पुण्य प्राप्ती होऊन स्वर्ग मिळतो अशी कल्पना रूढ असल्याचे दिसते. बौद्ध ममतालिशी जातक यांनी अशा लोकांना शिक्षित करण्याचा प्रयत्न केल्याचे नोंद आहे. सम्राट अशोकाने दिव्यांगासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्याचे उल्लेख आढळतात. विष्णू शर्मांनी लिहिलेल्या पंचतंत्रात मतिमंद व अतितीव्र मतिमंद यांना शिकविण्याचे पहिले शास्त्र निर्माण केले. पंचतंत्र हे दिव्यांगासाठीचे पहिले सर्वश्रेष्ठ पुस्तक मानले जाते.(जोसेफ आर. ए., २००४: ६)

४ थ्या शतकात सिंहल द्वीप मध्ये दिव्यांग मुलासाठी आश्रम निर्माण केल्याचे उल्लेख आढळतात. १२ व्या शतकात इंग्लंडचा राजा हेनरी द्वितीय यांनी दिव्यांग लोकांना वगळून कायदे बनविलेले होते. १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात दुष्ट आत्म्यांचे आपत्य असे दिव्यांगाना संबोधले जात होते. यातूनच मायावी व डायन हे उपरोधिक नामाभिधान दिव्यांगाना दिलेले दिसते. अशा व्यक्तींना शारीरिक दंड ही दिला गेला असेही उल्लेख आहेत. १६व्या शतकात विकलांगांना मूर्ख म्हटले जात होते. याच शतकाच्या उत्तरार्धात पोप ग्रेगरी यांनी विकलांग व्यक्तींना सहाय्य करण्याचा धर्मादेश काढला. या काळात दिव्यांग म्हणजे वाईट आत्मा ही समजूत दृढ होत गेली. मध्यकाळात ईसाई गिरजा घरामध्ये विकलांग लोकांना सेवा पुरली जात होती. (फिंक, विल्सन, कोनोवर, १९६४:३१४) दर्शनशास्त्री रेने डेकार्टस यांनी शिकण्याच्या सिद्धांताची सुरुवात केली. पेंद्रापोंस या स्पॅनिश संन्यासाने बहिऱ्या व्यक्तींना लिहिणे, बोलणे, वाचणे शिकवण्यास सुरुवात केली. भारतात याच काळात सूरदास हा संत जन्मजात दृष्टीहीन होता. यांनी भगवान श्रीकृष्णाच्या गुणांवर कविता लिहिल्या. याच काळात मुस्लिम दृष्टीहीन लोकांनी कुराण पाठ केल्याचे उल्लेख आढळता. मराठेशाहीत मुके व बहिरे लोक जासुशी करण्यासाठी गुप्तचर म्हणून नेमलेले दिसतात. **सारांश**, १७ व्या शतकात विकलांगाबाबत गांभीर्याने विचार केला आहे अशी माहिती मिळते.

**३) १८ वे शतक:**

या शतकात दिव्यांगाबाबत व दिव्यांगा बाबतच्या दृष्टिकोनात विशेष फरक पडलेला दिसतो. चार्ल्स मायकल (इसवी सन १७१२ ते १७९८) यांनी दिव्यांगांच्या बाबत वाणी व भाषा संबंधी संकेत पद्धती विकसित केल्याचे दिसते. सॅम्युअल हावे यांनी दिव्यांग व्यक्तींना शिक्षण देण्यासाठी संकेताची पद्धत विकसित केली. या पद्धतीने दिव्यांगांना शिक्षण देऊ जाऊ लागले. त्यामुळे त्यांना संकेत पद्धतीचे जनक म्हणतात. डॉ. डिटरिट यांनी १७४८ साली पॅरिस समाजपत्रातील लेख वाचून दृष्टीने अकार्यक्षम असणाऱ्या व्यक्तीसाठी शिक्षण सुरू केले. सर वेलनटाईन हार्वे यांनी दृष्टी अक्षराच्या प्रथम विद्यालयाची स्थापना पॅरिसमध्ये १७८४ साली केली. जीन मार्क इटार्ड यांनी दिव्यांगांना प्रशिक्षण देण्याच्या पद्धती विकसित केल्या. (रेड्डी, मालिनी, कुसुमा., २००४ : ६). पॅरिस जवळच्या जंगलात अकरा बारा वर्षाच्या बालकाला इटार्ड यांनी पाहिले जो बालक बोलण्यास अकार्यक्षम होता

त्याला त्यांनी शिक्षण दिले. थॉमस हॉपकिन्स गैलाउडेट यांनी बोटाच्या मदतीने दिव्यांग इतरांशी संप्रेषण करू शकतात असे दाखवून दिले.

**सारांश,** १८ व्या शतकात दिव्यांगासाठी क्रांतिकारक प्रयत्न झालेले दिसतात.

**४) १९ वे शतक:**

१९ व्या शतकाच्या प्रारंभी अमेरिका व फ्रान्स या देशात लोकशाही व व्यक्ती स्वातंत्र्य हे विचार पुढे आले. या शतकात दिव्यांगासाठी योग्य पद्धतीच्या शिक्षणाचे प्रयत्न सुरू झाले. १८६९ मध्ये इंग्लंड मध्ये चॅरिटी ऑर्गनायझेशन सोसायटीचा जन्म झाला**.** (सिंह सुडन कृपाल, १९९९: ११७) याच काळात ब्रेल यांनी सहा बिंदूंची प्रणाली शोधून काढली आज ती ब्रेल लिपी या नावाने ओळखली जाते.(जोसेफ आर. ए.,२००४ : ८) एडवर्ड सेंन्युवीन या फ्रेंच मानसशास्त्रज्ञाने दिव्यांगाना विशिष्ट संवेदनात्मक पद्धतीने शिकवावे असे सांगितले. भारतात १८२६ साली राजा काली शंकर घोष यांनी बनारस येथे अंधासाठीच्या पाठशाळेची स्थापना केली. १८४१ साली मद्रास येथे मंदबुद्धी मुलासाठी विशेष शाळांची स्थापना करण्यात आली. याच काळात स्विझर्लंड मध्ये होहान्गुगीन बुहु (ई.१८१६-१८६३) यांनी पर्वतीय प्रदेशात मतिमंद मुलांची निवासी शाळा स्थापन केली. डोरोथिया डिक्स यांनी अमेरिका व युरोपमध्ये मानसिक हॉस्पिटल विकसित करण्याचा प्रयत्न केला. १८६६ मध्ये 'इडीओसी अॅड इट्स ट्रीटमेंट बाय फिजिओलॉजिकल मेथड' हा ग्रंथ प्रकाशित झाला. (लवानिया एम. एम.,जैन शशी. के,१९९८: ३९) १८७० मध्ये फॉरीटार्स अॅक्ट नावाची शिक्षा निती बनवली. याच कायद्याने १८८२ मध्ये बहिऱ्या मुलांसाठी औपचारिक विद्यालय सुरू केले. (जोसेफ आर. ए., २००४: ८)

डॉ. कुजित वर्ग यांनी दिव्यांग व्यक्तीसाठी मद्रास येथे १९२९ आली असोसिएशन फॉर द ब्लाइंडची स्थापना केली. (जोसेफ आर. ए., २००४: १०) १९३१ मध्ये कर्णबधिरासाठी दिल्ली येथे लेडीज नाईस राजकीय विद्यालयाची स्थापना केली. १९३९ साली सरकारी मानसिक चिकित्सेसाठी वेगळा विभाग सुरू करण्यात आला. १९४१ साली मुंबई येथे चिल्ड्रन्स अँड सोसायटीची सुरुवात झाली. या सोसायटीत कर्णबधिर, दृष्टीहीन मतिमंद मुलांचा समावेश केला गेला. १९५० साली अमेरिकेमध्ये दिव्यांगासाठी नवी नीती बनण्यात आली व नॅशनल असोशिएशन फॉर द रिटार्डेड चिल्ड्रेन (एन. ए. आर. सी.) ची सुरुवात झाली. (जोसेफ आर.ए., २००४ : ११) १९५१ साली अमेरिकेत दिव्यांगासाठी डायग्नोस्टिक अँड स्टॅटीस्टिकल मॅन्युअल - प्रथम (डी.एस.एम.) चे प्रकाशन झाले. १९५४ साली श्रीमती निवासन यांनी अंधेरी (मुंबई) येथे नियमित शाळेची सुरुवात केली. भारत सरकारने **१९८४** साली **सिकंदराबाद** येथे दिव्यांगांना प्रशिक्षण व साधने मिळण्यासाठी **राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्थेची** स्थापना केली. या संस्थेचे मुख्य काम समाज जागृती करणे हे होते. याचबरोबर चार मुख्य राष्ट्रीय संस्थांची स्थापना केली गेली. **१९८५** साली दिव्यांगासाठी चालवले जाणारे कार्यक्रम यांची गुणवत्ता

तपासणे व त्यावर नियंत्रण ठेवणे यासाठी **भारतीय पुनर्वसन परिषद** निर्माण केली. **१९८७** साली भारतीय सरकारने **मानसिक आरोग्य कायदा** मंजूर केला. या कायद्यामध्ये विकलांग व्यक्तींना सुरक्षा व त्यांचे अधिकार यावर लक्ष केंद्रित केले. **१९९२** साली **भारतीय पुनर्वसन परिषद कायदा** बनविण्यात आला. विकलांग व्यक्तीचे पुनर्वसन व सेवा व त्यांचा सामाजिक दर्जा सन्मानित करण्यासाठी हा कायदा बनविण्यात आला**. १९९५** साली **अपंग कायदा** बनविण्यात आला. सामाजिक सुरक्षा, भेदभाव न करणे, तक्रार निवारण, शिक्षण, रोजगार, अपंगाचा विकास हा या कायद्याचा गाभा आहे. **१९९९** मध्ये **राष्ट्रीय न्यास कायदा** केला. ज्यामध्ये ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मानसिक ग्रस्त व्यक्तीसाठी पालकत्वाची योजना सुचविण्यात आली. **२००६** साली **अपंग व्यक्तीसाठी राष्ट्रीय धोरण** जाहीर करण्यात आले. समान संधी, हक्कांचे संरक्षण या धोरणात समाविष्ट करण्यात आले. **२०१६** साली **दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम** बनण्यात आला. यात **अपंगांचे २१ प्रकार** एकत्रित करून **दिव्यांग** या एकाच नावाचा वापर करावा असे सुचविण्यात आले.

**सारांश,** दिव्यांग व्यक्ती बाबत प्राचीन काळापासून आजपर्यंत अनेक व्यक्ती, संशोधक, राजे, देश यांनी विविध प्रयत्न केलेले दिसून येतात. दिव्यांगा बाबतचा गंभीर विचार प्राचीन काळापासून झाल्याचे यावरून सिद्ध होते. आज दिव्यांगा बाबतची जी साक्षरता, पुनर्वसन, प्रयत्न अस्तित्वात आहेत त्याची मुळे प्रागैतिहासिक काळापर्यंत पसरलेली दिसतात.

**संदर्भ :**


१. कछल दिपिका, (२०१६), 'दिव्यांग बांधवांचा सर्वसमावेशक प्रवास', योजना मासिक, नवी मुबई, पृ क्र. ४.

२. सिंह अर्चना, (२०१६), शारीरिक अक्षमता विरुद्ध क्षमता', योजना मासिक, नवी मुबई, पृ. क्र. ८.

३. जोसेफ आर.ए., (२००४), 'विशेष शिक्षा और पुनर्वास', समाकलन पब्लिशर्स वाराणसी. पृ.क्र. ५.

४. तत्रैव पृ. क्र. ५.

५. लवानिया एम. एम., जैन शशि. के., (१९९८), 'चिकित्सा समाजशास्त्र', रिसर्च पब्लिकेशन, जयपूर पृ. क्र. ३८.

६. जोसेफ आर.ए., (२००४), 'विशेष शिक्षा और पुनर्वास', उनि. पृ. क्र. ६

७. फिंक आर्थर, विल्सन इवरेंट, कोनोवर मेरील., (१९६४), 'समाजकार्य सिद्धांत एवं अभ्यास', (अनुवाद सिंह के. शंभूनाथ) हिंदी समिति सूचना विभाग, लखनौ पृ. क्र. ३१४.

८. रेड्डी जी लोकनंदा., मालिनी जे सुजाता., आणि कुसुमा ए., (२००४), 'मेंटल रिटार्डेशन एज्युकेशन अँड रिहबिलेशन सर्विसेस', डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस न्यू दिल्ली पृ. क्र. ६.

९. सिंह सुडन कृपाल, (१९९९) ) 'समाजकार्य सिद्धांत एवं अभ्यास', नवज्योती सांइटिफिक पब्लिकेशन्स लखनऊ पृ. क्र. ११७.

१०. जोसेफ आर.ए., (२००४), 'विशेष शिक्षा और पुनर्वास', उनि. पृ.क्र.८.

११. लवानिया एम. एम., जैन शशि. के.,(१९९८), 'चिकित्सा समाजशास्त्र', उनि.पृ. क्र.३९.

१२. जोसेफ आर.ए., (२००४), 'विशेष शिक्षा और पुनर्वास', उनि. पृ.क्र. ८.

१३. तत्रैव पृ. क्र. १०.

१४. तत्रैव पृ. क्र. ११.